**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

====================================================================

जावक क्रमांक –४८२९ / ६७ दिनांक :- ०१ नोव्हेंबर, २०२३

प्रसिद्धिपत्रक

## दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त म्हाडा मुख्यालयात व्याख्यान

मुंबई, दि. ०१ नोव्हेंबर, २०२३ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त 'भ्रष्टाचाराला नाही म्हणा, राष्ट्रासाठी वचनबद्ध व्हा' या संकल्पनेवर आधारित व्याख्यान 'म्हाडा'च्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयातील गुलजारीलाल नंदा सभागृहात आज आयोजित करण्यात आले.

यांप्रसंगी म्हाडातील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबईच्या सहाय्यक पोलिस आयुक्त श्रीमती मनीषा झेंडे म्हणाल्या की, ३१ ऑक्टोबर रोजी असणाऱ्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीचे औचित्य साधून केंद्रीय दक्षता आयोगाच्या निर्देशानुसार ३० ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान दरवर्षी दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. भ्रष्टाचारामुळे देशाच्या विकासाची गती मंदावते. भ्रष्टाचार कॅन्सरच्या आजाराप्रमाणे देशाची सामाजिक, आर्थिक चौकट पोखरत आहे. ज्यामुळे समाजाचे संतुलन बिघडत आहे. पारदर्शक आणि स्वच्छ प्रशासन प्रस्थापित करण्याकरिता भ्रष्टाचार निर्मूलन ही काळाची गरज आहे व त्यासाठी देशाच्या प्रतेक नागरिकाने प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे मत त्यांनी पुढे मांडले. यावेळी श्रीमती झेंडे यांनी उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त सत्यनिष्ठतेची शपथ दिली.

तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबईच्या सहाय्यक पोलिस आयुक्त श्रीमती नीता मिसाळ यावेळी म्हणाल्या की, भ्रष्टाचार ही जागतिक समस्या आहे. देशाच्या प्रगतीसाठी भ्रष्टाचारमुक्त देश होणे गरजेचे आहे. शासकीय कर्मचारी यांनी नागरिकांप्रती निष्ठा ठेऊन लोकसेवक म्हणून कामे केले पाहिजे. भ्रष्टाचार हे चक्रव्यूह असून या चक्रव्यूहात न अडकण्याचे आवाहन श्रीमती मिसाळ यांनी याप्रसंगी केले.

या कार्यक्रमाला म्हाडाचे सचिव श्री. राजकुमार सागर, सहाय्यक पोलिस आयुक्त श्री. अविनाश पोवार, पोलिस निरीक्षक श्री. इम्रान इनामदार, मुख्य अभियंता श्री. शिवकुमार आडे, उपमुख्य अभियंता श्री. महेश जेस्वानी, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, मुंबई मंडळाच्या उपमुख्य अधिकारी श्रीमती कमल पोवळे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन म्हाडाचे जनसंपर्क अधिकारी श्री. हेमंत पाटील यांनी केले. या कार्यक्रमाला म्हाडातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा


करा "भ्रष्टाचारमुक्त" महाराष्ट्र
"लाचेची नशा करते जीवनाची दुर्दशा"
भ्रष्टाचारासंबंधी तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे संपर्क साधावा.
acbmaharashtra.gov.in
www.acbmaharashtra.net
लाच घेणे आणि देणेही गुन्हा आहे.
म्हाडा
MHADA